# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of History

## Assignment

## Session: 2019 – 2020

Name : Sneha J. Bagde

Class : B.A Final (V sem)

Subject : History

College : yashoda girls Arts and Commerce snehanagar Nagpur

Sir : Dr. Shuryakanta Kapsikar

2019-2020

SEAL

1] पहिल्या महायुद्धाची कारणे

⇒ 1) प्रस्तावना :-

प्रथम महायुद्धाला आता एक शतक पूर्ण झाले आहे. विविध क्रांतीकारी घटनांनी हे शतक गाजले १९१४ ते १९१८ यादरम्यान युरोपमध्ये हे युद्ध सुरू झाले या युद्धात ~~युरोपमध्ये~~ हे एका बाजूला इंग्लंड - फ्रान्स - रशिया या मित्रगट तर दुसऱ्या बाजूला जर्मनी आस्ट्रीयाहंगेरी आणि तुर्कस्थान यासारखे बलाढ्य राष्ट्रे होती.

२८ जून १९१४ रोजी ऑस्ट्रीयाचा युवराज आर्चड्युक फ्रांस फर्डिनंड आणि त्याचा पत्नीच्या हत्येतून या युद्धाची सुरूवात झाली हे खरे असले तरी ती घटना युद्धाचे केवळ तात्कालिक निमित्य होते १८७१ मध्ये जर्मनीच्या एकीकरणापासून जगावर पहिल्या महायुद्धाचे सावट पडावयास प्रारंभ झाला होता जर्मनीचे एकीकरण घडवून आणण्याच्या प्रयत्नात झालेले फ्रांस प्रशिया युद्ध व त्यात फ्रान्सच्या पराभव होऊन अल्सेस लॉरेनच्या फ्रांसच्या प्रदेश जर्मनीला मिळाल्यापासूनच युरोपातील परस्पर द्वेषास सुरूवात झाली फ्रांसला कोणताही मित्र मिळू नये

या धोरणातून जर्मन चांसलर बिस्मार्क याने आपले परराष्ट्र धोरण आखले त्यानुसार गुप्त राजनितीच्या माध्यमातून मैत्रीतहाद्वारे जर्मनीची बाजु भक्कम बनवून फ्रांसला आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकी पाडले. परंतु कैसर विल्यम द्वितीयच्या काळात त्याच्या अतिमहत्वाकांक्षी धोरणामुळे युरोपात संशयाचे व अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. त्यातुन शस्त्रास्त्र स्पर्धा निर्माण होऊन युरोपिय राजकारणात निर्माण दोन गट निर्माण झाले. युरोपिय राष्ट्रांच्या परस्परविरोधी आकांक्षा, चढाओढ, हेवेदावे, साशंकता व भिती यामुळे महायुद्धाचा काळ प्रचंड स्फोटकता युरोपिय राजकारणात निर्माण झाली होती. बाल्कन प्रश्नातून सर्बिया व आस्ट्रीया एकमेकांचे कट्टर शत्रू बनले होते. १९०८ मध्ये आस्ट्रीयाने बोस्नियाव हर्जेगोविना घेतल्यापासूनच सर्बिया व आस्ट्रीया यांच्यातील संघर्ष वाढीस लागला होता. दुसऱ्या बाल्कन युद्धानंतर झालेल्या बुखारेस्ट तहामुळे अल्बेनिया नावाचे नवे राज्य उदयास आले परिणामत: विशाल सर्बिया निर्माण करण्याची सर्बियाची इच्छा अपुर्ण राहिली. त्यामुळे आस्ट्रीया व सर्बियातील शत्रुत्व टोकाला जाऊन

भिडले अशा स्फोटक वातावरणात आ-र्चड्यूक फ्रांस आस्ट्रीयाच्या युवराज फर्डिनंडचा वध झाला व पहिल्या महायुध्दास प्रारंभ झाला. या युध्दाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

2) संकुचित राष्ट्रवाद :-

प्रथम महायुध्दास का-रणीभूत ठरलेले अत्यंत महत्त्वाचे कारण आक्रमण राष्ट्रवाद होय. युरोपातील सर्व राष्ट्रात राष्ट्रवादाचा विकास वाढीस लागला समान जाती, धर्म, भाषा व ऐतिहासिक परंपरेचे व्यक्ती एकत्र राहिले व एकत्र काय केले तर त्या देशाची वेगळी ओळख निर्माण होऊन देशाची प्रगती होईल अशी भावना युरोपात जलदगतीने वाढली. प्रारंभी याच आधारावर जर्मनी व इटलीचे एकी-करण झालेले होते. तुर्की साम्राज्यांतर्गत असलेल्या बाल्कन प्रदेशात ही भावना अधिक प्रबळ होती. तुर्की साम्राज्य कमकुवत हो-ताच या क्षेत्रात स्वातंत्र्याची मागणी जोर धरू लागली. तुर्की साम्राज्य व आस्ट्रीया हंगेरी अशा अनेक क्षेत्रात स्लॉव्ह वंशाच्या लोकांची संख्या अधिक होती. ते वेगळ्या स्लॉव्ह वंशाच्या राष्ट्राची मागणी करीत होते. आपल्या राष्ट्रावर प्रेम व स्पर्धक राष्ट्राचा द्वेष अशा भावना निर्माण होऊ

SEAL

लागल्या जर्मनीचे जगावर प्रभुत्व किंवा जर्मनीचा नाश अशी जर्मन सम्राट कैसर विल्यम द्वितीयने भूमिका घेऊन जर्मनीत आक्रमक राष्ट्रवाद निर्माण केला. अल्सेस व लॉरेन प्रदेशावरून निर्माण केला झालेला जर्मनीबद्दलचा द्वेष कधीही कमी होता कामा नये अशी शिकवण फ्रेंच विचारवंत आपल्या देशवासियांना देत होते. काही इटालियन प्रदेश ऑस्ट्रीयाच्या अंमलाखाली असल्याने इटलीच्या प्रदेश ऑस्ट्रीयाविरुद्ध द्वेष होता. सत्य व संस्कृतीची कास धरणारे आम्ही फक्त फ्रेंच आहोत. असे फ्रेंचांना वाटत होते. युरोपात निर्माण झालेल्या या अतिरेकी राष्ट्रवादाच्या भावनेला कोणीही आवर न घातल्याने पहिले महायुध्द उद्‌भवले.

3) लष्करवाद :- साम्राज्यवादाप्रमाणे लष्करवादानेही प्रथम महायुध्द अधिक जवळ आणले प्रत्येक राष्ट्र आपल्या सुरक्षा व साम्राज्यवादी नीतिला कार्यान्वित करण्याकरिता शस्त्रास्त्र निर्मिती व शस्त्र खरेदी - विक्रीच्या प्रक्रियेत गुंतला आपापल्या वसाहतीच्या सुरक्षेकरिता सैनिकीदृष्ट्या मजबूत असणे आवश्यक झाले होते. परिणामत: युध्दाचे नवीन

अस्त्र शस्त्र निर्माण करण्यात आले रा-
ष्ट्रीय उत्पनाचा फार मोठा हिस्सा श-
स्त्रास्त्रनिर्मिती व सैन्य संघटनावर खर्च
होऊ लागला. फ्रान्स व जर्मनी आपल्या
राष्ट्रीय उत्पनापैकी 85% सैन्य व्यवस्थेवर
खर्च करू लागला होता. अनेक देशांमध्ये
सैनिक सेवा अनिवार्य करण्यात आली सैनिक
संख्येत प्रचंड वाढ करण्यात आली. देशाच्या
राजकारणात सैनिक अधिकाऱ्याचे वर्चस्व
निर्माण झाले फ्रांसला लष्करी सामर्थ्याशिवाय
जर्मनीचा सूड व अल्सेस लॉरेनचे प्रदेश
मिळविणे शक्य नव्हते. जगात जर्मनीचे
वर्चस्व किंवा नाश अशी टोकाची भुमिका
होणाऱ्या कैसर विल्यम द्वितीय याला
सर्वात जास्त बसाहती व त्यासाठी सागरावर
वर्चस्व मिळविणे आवश्यक वाटत होते. यातून
जर्मनीने आपले नौदल वाढविण्याकरिता
१८९८ मध्ये नाविक संघ स्थापन केला.
जगातील सर्वात मोठ्या नाविक शक्तीशी
टक्कर देण्याइतपत जर्मनीचे जाहिर केल्या-
मुळे इंग्लंडही सावध होऊन आपले नाविक
सामर्थ्य वाढवू लागले. जर्मनीच्या लष्कर
वाढीचे प्रतिसाद संपुर्ण जगभर उमटले व
सर्वत्र शस्त्रास्त्र स्पर्धा निर्माण झाली. संपुर्ण
युरोपाला लष्करी छावनीचे स्वरूप आले.
मुकंदरीत संशय व भिती यामुळे शां
तता संपुष्टात येते. ही शांतता टिकवुन

SEAL

धरण्यासाठी व प्रत्यक्ष संघर्षाला सामोरे जाण्यासाठी देशाचे लष्करीकरण करणे आवश्यक आहे या भावनेत वाढ होऊन लष्करीकरणातून पहिले महायुद्ध उद्भवले

4) गुप्त राजकारण :-

आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार एखादा देशांनी दुसऱ्या देशांशी केलेला करार आंतरराष्ट्रीय समुदायासमोर प्रसिद्ध करणे आवश्यक असते. परंतु या काळात युरोपात गुप्ततेचे वर्चस्व होते. बिस्मार्क तर गुप्त राजकारणाचा शिल्पकार मानला जातो. बिस्मार्कने फ्रांसला आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकी पाडण्याकरिता आस्ट्रीया - हंगेरी - इटली असा त्री-राष्ट्र करार केला. परिणामतः फ्रान्स व इंग्लंडने आपले शत्रुत्व बाजूला ठेवून जर्मनविरोधात मैत्री करार केला. गुप्त राजनितिमुळे युरोपात साशंकता व भितीचे वातावरण निर्माण झाले. परिणामतः युरोपात अस्थिरता निर्माण होऊन जग महायुद्धात लोटल्या गेले.

## 5) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव :-

या काळात देशादेशांमधील समस्या चर्चेद्वारे सोडवून युद्धाला आवर घालणारी एकही आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात नव्हती. प्रत्येक देश आपली मनमानी करीत होता. गुप्त करारावर नियंत्रण ठेवण्यास आंतरराष्ट्रीय कायदा अस्तित्वात आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेची आवश्यकता होती. युद्ध सुरू होण्यापूर्वी इंग्लंडने फ्रांसला नेमकी कोणती आश्वासने दिली होती हे कॉमन्स सभेला सांगण्यात आले नव्हते. तसेच इटली हा त्री-राष्ट्र गटाचा सदस्य होता तरीही त्याने १९०२ मध्ये फ्रांसबरोबर व १९०९ मध्ये रशियाबरोबर वेगवेगळे गुप्त करार केले होते. इटलीच्या या वर्तनावर कारवाई करणारी एकही संघटना अस्तित्वात नसल्याने जग पहिल्या महायुद्धात ओढल्या गेले.

## 6) आर्थिक वसाहतवाद :-

आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या नावाखाली युरोपातील बड्या राष्ट्रांनी आपला साम्राज्य विस्तार करण्यास प्रारंभ केला. यातूनच जगाच्या पाठीवर ब्रिटिशांचे साम्राज्य सर्वात्मत्वपणे पसरले. अशा साम्राज्यात इंग्लंडच्या मत्सर करणाऱ्या राष्ट्रांनीही आपल्या देशाच्या प्रादेशिक सीमा वाढविण्यासाठी

SEAL

योजना तयार केल्या. त्यामुळे परस्पर शेजारी असलेल्या राष्ट्रामध्ये स्पर्धा सुरू झाली. युरोपमधील लहानमोठ्या राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडात वसाहती मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वसाहतीमुळे देशांची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा सहज साधता येणार होती तसेच वसाहतीतून कच्चा माल पुरविणे, तेथील बाजारपेठेत आपल्या कारखान्यातील पक्का माल विकणे, वसाहतीमध्ये आपल्या देशातील लोकांचे स्थलांतर करणे. स्थलांतरीत वसाहतून अतिशय कमी दरात श्रमशक्ती वसाहतीतून अतिशय कमी उपलब्ध होत असल्याने कारखानदारांनी अमाप नफा मिळत होता. या संधीचा फायदा घेण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी, जपान, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, डेन्मार्क, स्पेन, पोर्तुगाल आणि अमेरिका या राष्ट्रांनी एकच गर्दी केली वसाहती जिंकण्याकरिता स्पर्धा सुरू झाली. ती स्पर्धा युद्धाची पार्श्वभूमी तयार करण्यास कारणीभूत ठरली.

7) आक्रमक साम्राज्यवाद :- साम्राज्यवादी देशांची साम्राज्यविस्ताकरिता असलेली परस्पर स्पर्धा प्रथम महायुद्धाचे मह-

त्वपूर्ण कारण मानले जाते इंग्लंडमध्ये औ-
द्योगिक क्रांती झाल्यामुळे वस्तुच्या उत्पाद-
नात प्रचंड वाढ झाली इंग्लंडनंतर फ्रांस
इटली, प्रशिया ही राष्ट्रे उद्योगशील बनली.
त्यासाठी कोळसा, लोखंड, कापूस, रबर, इ-
त्यादी कच्च्या मालाची आवश्यकता व
मालाचा सतत पुरवठा, पक्का माल वितरित
करण्यासाठी बाजारपेठांची आवश्यकता व
मालाचा सतत पुरवठा युरोपियन राष्ट्रांनी
आपले लक्ष नैसर्गिक साधनांनी समृद्ध
अशा आशिया व आफ्रिका खंडाकडे
वळविले. यातून आर्थिक साम्राज्यवाद,
निर्माण होऊन वसाहती मिळविण्याकरिता
स्पर्धा निर्माण झाली इंग्लंड, फ्रान्स, रशिया,
जर्मनी, इटली, ऑस्ट्रीया, रशिया, जर्मनी,
इटली, आर यासारखी जवळपास सर्वच
युरोपियन राष्ट्रे साम्राज्यस्पर्धेत सहभागी
झाल्याने वसाहतीवरून त्यांच्यात संघर्ष नि-
र्माण होते. इंग्लंड, फ्रांस, रशीया या
देशांनी आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रीया खंडात
आपापल्या वसाहती निर्माण करून त्यावर
अधिकार प्रस्थापित केलेला होता. जर्मनी
व इटली वसाहतवादाचा स्पर्धेत उशिरा
उतरल्याने त्यांच्या साम्राज्यविस्ताराची शक्यता
कमी होती त्यामुळे या देशांनी दुसऱ्या
राष्ट्राच्या वसाहतीवर बलपुर्वक अधिकार
प्रस्थापित करून आपली स्थिती मजबुत

SEAL

बनविण्याची साम्राज्यवादाच्या विस्ताराची नवी नीति अवलंबिली.

प्रथम महायुध्दाच्या आरंभापूर्वी जर्मनीची आर्थिक व औद्योगिक स्थिती अत्यंत मजबूत झाली होती साम्राज्य विस्ताराच्या स्पर्धेचे पर्यवसान पहिल्या महायुध्दात झाले.

8) युरोपचे दोन गटात विभाजन :- जर्मन चॅन्सलर बिस्मार्कने जर्मनीचे एकीकरण करण्यासाठी फ्रांसच्या विरोधात अनेक परस्परविरोधी आंतरराष्ट्रीय करार केले त्यामध्ये जर्मन-ऑस्ट्रिया आणि इटली ह्या राष्ट्रामध्ये त्रिराष्ट्र करार झाला. अशाप्रकारे प्रभावी साधन आंतर-राष्ट्रीय समतोल राखण्यासाठी अंमलात आणला. बिस्मार्कनंतर त्रिराष्ट्र मैत्री करा-याला प्रत्युत्तर देण्यासाठी युरोपमध्ये रशिया, फ्रान्स व इंग्लंड या राष्ट्रांनी आपसात सहकार्य करण्यास सुरुवात केली. अशा प्रकारच्या सहकार्यामधुनच इ. स. 1893 मध्ये फ्रान्स-रशियात मैत्री करार, इ. स 1904 मध्ये इंग्लंड फ्रान्समध्ये मैत्री करार आणि 1907 मध्ये इंग्लंड - रशिया मैत्री करार झाला. अशा प्रकारच्या मित्र संघालाच त्रिराष्ट्र

मित्र संघ असे म्हटले जाते. या दोन जागतिक करारांमुळेच युरोपमध्ये दोन गट पडले हे दोन्ही गट तुल्यबळ असल्यामुळे एकमेकांवरील आक्रमणाच्या भीतीने दोन्ही गटांनी शास्त्रास्त्रांची जमवाजमव करण्यास सुरूवात केली यामुळेच संपूर्ण युरोपचे दोन गटांमुळे विभाजन होऊन जगाची परिस्थिती युध्दासाठी अनुकूल बनली

9) तत्कालीन कारण :- अशाप्रकारे युरोपात प्रचंड तणावाचे वातावरण असतांना एक भयंकर घटना घडली व त्याच्या ठिणगीने युध्दाचा भडका युरोपात निर्माण झाला. आस्ट्रीया व सर्बिया यांच्यातील संबंध इ. स 1908 ते 1914 या काळात पूर्णपणे बिघडले 28 जुन १९१४ रोजी सर्बियातील काही अतिरेकी संघटनानी आस्ट्रीयाच्या राजपुत्र आर्चड्युक फ्रांसीस फर्डिनंड व त्यांची पत्नी बोस्निया प्रांताची राजधानी सॅरेजेव्हो येथे गेले असतांना त्यांची हत्या करण्यात आली. या खुनामागे सर्बिया असल्याची बाब पुढे येताच आस्ट्रीयन सरकारने सर्बियाला खुनास जबाबदार ठरवून सर्बियावर आक्रमण केले. अशारीतीने पहिल्या महायुध्दास सुरूवात झाली.

10) मूल्यमापन :- १९१४ ते १९१८ यादरम्यान युरोपमध्ये हे युद्ध सुरू झाले. एका बाजूला इंग्लंड - फ्रान्स - रशिया हा मित्र-गट तर दुसऱ्या बाजूला जर्मनी - आस्ट्रीया - हंगेरी आणि तुर्कस्थान यासारखे बलाढ्य राष्ट्रे होती पहिल्या महायुद्धाची कारणे मुद्द्यानुसार स्पष्ट केले आहे. इंग्लंड- फ्रान्स- रशिया या-च्याविरूद्ध आस्ट्रिया- जर्मनी असे गट निर्माण झाले. इ. स 11 नोव्हेंबर 1918 रोजी पहिले महायुद्ध समाप्त झाले.

SEAL
Principal
Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15